लोकमत

# ‘किशोर’चे दुर्मिळ अंक आता ऑनलाइन..!

## बालभारतीचा उपक्रम : ३० हजार पानांचे साहित्य

लोकमत न्यूज नेटवर्क



**पुणे :** बालभारतीकडून प्रकाशित होणारे व मागील ४७ वर्षे मुला-मुलींच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या किशोर मासिकाच्या १९७१ पासूनच्या अनेक दुर्मिळ अंकांचा खजिना सर्वांसाठी बालभारतीच्या संकेतस्थळावर ऑनलाइन उपलब्ध करण्यात आला आहे. आतापर्यंत प्रकाशित करण्यात आलेल्या ५५१ अंकांच्या ३० हजार पानांचे बालसाहित्य डिजिटलायजेशन करून ऑनलाइन उपलब्ध केले आहे.

राज्यातील एसएससी व एचएससी बोर्डाच्या १ ली ते १२ वी पर्यंतची शालेय पुस्तके तयार करणे व कोट्यवधी पुस्तकांची छपाई करून ती विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचे काम बालभारतीकडून केले जाते. बालभारतीची पाठ्यपुस्तके वाचत अनेक पिढ्या मोठ्या झाल्या. बालभारतीकडून १९७१ मध्ये ८ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांसाठी ‘किशोर’ हे मासिक सुरू करण्यात आले.

मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, त्यांना अभ्यासक्रमाबाहेरचे ज्ञान मिळावे, त्यांच्या संवेदनशील मनावर उत्तम मूल्यांचे संस्कार व्हावेत ही उद्दिष्टे ठेवून किशोर मासिकाची सुरुवात करण्यात आली. अल्पावधीतच गुणवत्तेच्या जोरावर किशोर मासिकाने स्वत:चे वेगळे स्थान निर्माण केले. सध्या राज्यात किशोरचे ८० हजार वर्गणीदार आहेत. (पान ६ वर)

### दिग्गज कलाकृतींचा आनंद घेता येणार

गेल्या ४६ वर्षांत किशोर मासिकाने अनेक पिढ्यांवर वाचनाचे, ज्ञान-विज्ञानाचे व मूल्यांचे संस्कार केले आहेत. अनेक नामवंत लेखक, कवी, चित्रकार यांनी किशोरसाठी योगदान दिले आहे. जुन्या अंकांची वाचकांकडून मागणी होत होती. डिजिटलायझेशनच्या निमित्ताने हा सर्व दुर्मिळ खजिना ऑनलाईन मोफत उपलब्ध झाला आहे. दर्जेदार बालसाहित्य आणि अनेक दिग्गज चित्रकारांच्या कलाकृतींचा आनंद या माध्यमातून घेता येणार आहे.

**- किरण केंद्रे**, कार्यकारी संपादक (किशोर), बालभारती

लोकमत

# 'किशोर'चे दुर्मिळ अंक आता ऑनलाइन..!

(पान १ वरुन) अनेक नामवंत लेखक, कवी, चित्रकार यांनी किशोर मासिकामधून लिखाण केले आहे. अनेक दुर्मिळ कथा, कविता व चित्रे या मासिकामधून प्रकाशित झाल्या आहेत. त्या दुर्मिळ ऐवजाचा शोध घेत अनेकजण बालभारतीकडे यायचे. यापार्श्वभूमीवर बालभारतीकडून हा सर्व खजिना सर्वांसाठी खुला करण्यात आला आहे. आजवरचे सर्व अंक आता डिजिटल रुपात ऑनलाइन मोफत उपलब्ध झाले आहेत. बुकगंगातर्फे सामाजिक बांधिलकी म्हणून हा प्रकल्प कुठलाही मोबदला न घेता केला. शालेय शिक्षण मंत्री विनोद तावडे यांच्या हस्ते नाशिक येथे झालेल्या कार्यक्रमात याचे नुकतेच लोकार्पण करण्यात आले. दर्जेदार बालसाहित्य आणि अनेक दिग्गज चित्रकारांच्या कलाकृतीचा आनंद या माध्यमातून घेता येणार आहे.

Pune Main
Page No. 8 Nov 27, 2017
Powered by: erelego.com